वयोवृद्धः मनोयुवा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा


कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३० | अंक-४+५ | एप्रिल-मे २०२२

## जागतिक महिला दिन विशेषांक (भाग २)

### महिला दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमांची क्षणचित्रे





शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. कुलगुरु सर व मा. उर्मिला जोशी (निवृत्त जिल्हा न्यायाधीश)











## महिला दिनानिमित्त सर्व महिला भगिनींना आणि महिला दिन विशेषांकास हार्दिक शुभेच्छा..!



डॉ. सौ. विभा शहा
(कोल्हापूर)



डॉ. सौ. लता मोरे
(रुकडी)



सौ. मोहसिना चिकोडी
(चिकोडी)



सौ. हेमलता माने
(रामानंदनगर, सांगली)



सौ. किरण लोंढे
(सरपंच, कसबे डिग्रज)



सौ. नंदा थोरात
(कोल्हापूर)



सौ. जयमाला काळे
(सुभाषनगर, मिरज)



सौ. जयदेवी चव्हाण
(जत, जि. सांगली)



सौ. सुवर्णा ठिगळे
(सांगली)



डॉ. प्रा. मिनाक्षी मोरे
(गारगोटी)



सौ. सुरेखा रांजणे
(सुभाषनगर, मिरज)



सौ. नर्मदा केसरे
(सुभाषनगर, मिरज)



सौ. रजनी मासुले
(क.डिग्रज, जि. सांगली)



रजिया खान
(सुभाषनगर, मिरज)



सौ. रेहाना जमनावाले
(मिरज)



सौ. शाहीन खान
(सुभाषनगर, मिरज)

# ज्येष्ठ नागरिक संघाच्या महिला अध्यक्षा यांचे कार्य



श्रीमती सुलोचना माने
अध्यक्षा, अंबिका महिला ज्येष्ठ नागरिक संघ,
कवठेमहांकाळ, जि.सांगली.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुका पर्जन्यमानाचा दुष्काळ असलेला सर्व दृष्टीने दुष्काळी तालुका समजला जातो. तालुका स्तरावरील नगर पंचायत गावच पिण्याचे पाण्याचे दुर्भिष्य असलेले गाव असेल तर ग्रामीण भागाचा विचार न केलेलाच बरा. दगड धोंड्यांनी व्यापलेले क्षेत्राचा आणि कमी पर्जन्यमानाचा विचार केला तर शेतीचे किफायतशीर उत्पन्न नाहीच म्हणावे लागेल. अशा दुष्काळग्रस्त तालुक्यात पूर्वी ५३ ज्येष्ठ नागरीक संघ गठीत केले गेले. त्यावेळी पदाधिकारी यांचेकडून आर्थिक लाभाचे प्रलोभन दाखविले गेले आणि आजही या ग्रामीण भागातील ज्येष्ठ त्यावेळच्या प्रलोभनाबाबत विचारणा करतांना दिसतात आणि याच कारणास्तव ५३ पैकी आज केवळ २५ ज्येष्ठ नागरिक संघच क्रियाशील असतांना दिसत आहेत. यापैकीच दुष्काळी भागातील क्रियाशील बनविलेला माझा महिला ज्येष्ठ नागरिक संघ आहे.

मी एक गृहीणी असून पूर्वीपासूनच माझा सामाजिक कार्य करणेचा पिंड आहे. पिडीतांना मदत करणेचा, त्यांच्या व्यथा दूर करणेचा, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आर्थिक लाभ मिळवून देणेचा प्रयत्न करणेचा व त्याव्दारा मानसिक समाधान मिळविणेचा प्रयत्न मी करते. माझ्या या सामाजिक कार्याची जाण सध्याचे फेस्कॉमचे उपाध्यक्ष व मनोयुवा कौन्सिलचे प्रमुख अंजुमन खान यांना आहे. आमचा परिचय त्यांच्या नोकरीच्या काळात २५/३० वर्षापासूनचा असून त्यांच्या प्रेरणेनेच मी ज्येष्ठ नागरिक चळवळीत सहभागी झाले.

वास्तविक पाहता माझा जन्म कैकाडी समाजात झाला असला तरीही साधारण १९८६ पासूनच दलीत व पिडीत महिलांच्या सेवेचे व्रत मी अंगिकारले आहे. त्यावेळी मला कार्याबद्दल माझे पती यांनीही मोलाची साथ दिली होती. शिवण क्लासच्या माध्यमातून जवळ जवळ ३२५ मुलींना स्वावलंबनाचे धडे दिले. त्यांना त्यांच्या पायावर उभे राहणेची शक्ती प्राप्त करुन दिली. दुष्काळी कालावधीत झुणका भाकर केंद्र देखील महिलांच्या सहकार्याने यशस्वीरित्या चालविले. या सामाजिक कार्यामुळे शासनाच्या विविध अधिकारी यांचा परिचय वाढत गेला.

या सामाजिक कार्यास ज्येष्ठ नागरिक संघाद्वारा अधिकच चालना मिळत गेली. माझ्या वाढत्या सामाजिक कार्यास ज्येष्ठ नागरिक संघामुळेच यशाची शिखरे पादाक्रांत करणेचे बळ प्राप्त झाले. कोणतेही सामाजिक कार्य करतांना निस्वार्थभाव ठेवला तरच यश मिळत जाते ही माझी पूर्वीपासूनची भावना असलेने विविध शासकीय अधिकारी यांनी माझ्या कार्याची दखल घेवून विविध सामाजिक प्रश्न सोडविणेस मदत केली आहे व करत आहेत. दीनदलीत व पिडीत महिलांची कामे करतांना त्यांना कोणताही आर्थिक खर्च येणार नाही याची काळजी घेवून प्रसंगी माझ्या खर्चाने देखील त्यांची कामे मी करुन देत आहे. तलाठी, ग्रामपंचायती, नगर पंचायत या बरोबरच तालुका स्तरावरील विविध कार्यालयाकडील विविध दाखले मी पिडीतांना / दीनदलीत महिलांना मिळवून देणेचा निस्वार्थ भावनेने मी कार्य करीत आहे. हे कार्य करीत असतांना ज्येष्ठ नागरिक संघ म्हणजे काय? आणि यात किती शक्ती आहे याचे प्रत्यंतर मला आले. या माध्यमातून कार्य करतांना मी आजअखेर २७४ ज्येष्ठांना श्रावणबाळ योजनेअंतर्गत पेन्शनचा लाभ मिळवून दिला आहे. त्याचप्रमाणे ५०० विधवा महिलांना, दिव्यांगाना आणि दुर्बल घटकांतील स्त्री-पुरुषांना शासनाच्या संजय गांधी योजने अंतर्गत पेन्शनची सुविधा मिळवून दिली आहे. पंचायत समितीचे माध्यमातून देखील अनेक लाभ मिळवून दिले

आहेत. पोलीस खात्याच्या सहकार्याने ४६ त्रस्त ज्येष्ठांना कौटुंबिक कलहापासून न्याय मिळवून दिला आहे. मुले/सुनांकडून बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना होत असलेल्या प्रकरणी समुपदेशकाची भूमिका पार पाडून समझोता घडवून आणलेला आहे. ज्येष्ठ नागरिकांना कौटुंबिक कलहापासून वाचवून त्यांचे उर्वरित आयुष्यात कलह वाढू नयेत असा प्रयत्न केला आहे. ८३० नागरिकांना रेशन कार्डे मिळवून दिली. १५९ शालेय विद्यार्थ्यांना एस.टी.पास मिळवून देणेस मदत केली. निवडणूकीपूर्वी जवळ जवळ १९०० नागरिकांची मतदार यादीत नावे समाविष्ट करणेबाबत सहकार्य केले. शासनाच्या आरोग्य विषयक उदाहरणार्थ महात्मा फुले जन आरोग्य योजना / पंतप्रधान योजनांचा प्रचार आणि प्रसार केला असून त्याचा फायदा ज्येष्ठांबरोबरच सर्वच नागरिकांनी घ्यावा असा प्रयत्न केला असून सध्याही करत आहे. ज्येष्ठांचे आरोग्य सुधारावे यासाठी आरोग्य शिबिरे, व्याख्याने घेतली असून तालुक्यातील सर्वच संघांनी ज्येष्ठांच्या आरोग्याबाबत शिबिरे, व्याख्यानासह दक्ष रहावे असाही प्रयत्न करत आहे.

महिला ज्येष्ठ नागरिक संघाची अध्यक्ष या नात्याने केवळ माझ्या संघाचाच विचार न करतां तालुक्यातील नागरिकांचे विविध प्रश्न सुटावेत या दृष्टीने देखील मी प्रयत्नशील असते. ज्येष्ठ नागरिक महिला संघाचे अध्यक्ष म्हणून निस्वार्थी भावनेने काम करतांना तालुक्याचे तहसिलदार श्री.बी.जी.गोरे, पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र शहाणे, गटविकास अधिकार श्री. उदयकुमार कुसुरकर, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉ. संतोष मोरे हे मला प्रत्येक सामाजिक कार्यात जनतेचे ज्येष्ठांचे प्रश्न सोडविणेस मदत करतात. कोणतीही अडचण निर्माण करीत नाहीत. कायद्याला व्यवहाराची जोड देवून काम करणेची त्यांची कार्यपध्दती कौतुकास्पद मानते.

माझ्या सामाजिक कार्याची नोंद अनेक संस्थांनी घेतली असून मिळालेल्या विविध पारितोषकांनी मला यशाचे शिखरावर बसविले आहे. या सर्वांची मी ऋणी आहे. ज्येष्ठ नागरिक महिला संघाची अध्यक्ष या पदा बरोबरच मी सध्या खालील पदावर काम करीत आहे.

१) अध्यक्षा - अंबिका महिला ज्येष्ठ नागरिक संघ, कवठेमहांकाळ

२) सदस्या - फेस्कॉम प्रादेशिक विभाग सांगली.

३) सदस्या - शांतता कमेटी, दक्षता कमेटी (पोलीस).

४) जिल्हा अध्यक्ष- राष्ट्रीय मानवाधिकार समिती

५) संचालिका - महाराष्ट्र कैकाडी समाज उद्योग समुह

६) अध्यक्ष - जयहिंद शिक्षण प्रसारक मंडळ

७) सदस्या - तालुका दक्षता व नियंत्रण समिती

८) मुख्य संघटक- सांगली जिल्हा ग्रामीण सेवा संघटक (महिला)

९) उपाध्यक्षा - महाराष्ट्र राज्य कैकाडी समाज

१०) तालुकाध्यक्ष- महिला आघाडी (काँग्रेस)


११) महिला अध्यक्षा- गांधी आंबेडकर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी मजुर संघटना.

* * *




## महिला दिनानिमित्त सर्व महिला भगिनींना आणि महिला दिन विशेषांकास हार्दिक शुभेच्छा..!


सौ. खुर्शीदबानु खान
(सुभाषनगर, मिरज)


सौ. शुभांगी सबनीस
(कोल्हापूर)


सौ. नीला फडके
(कोल्हापूर)


सौ. अलका कुलकर्णी
(कोल्हापूर)


सौ. छाया नलवडे
(कोल्हापूर)


सौ. जस्मीन खान
(शिर्डी)


सौ. प्रियांका पाटील
(रामानंदनगर, सांगली)


सौ. मासायबी शेख
(सुभाषनगर, मिरज)


सौ. म्हैरुन गवंडी
(सांगली)


श्रीमती वासंती मेरु
(पलूस, सांगली)


श्रीमती सुमन वड्डीकर
(पलूस, सांगली)


सौ. शाहीदा मुरसल
(सांगली)


सौ. सुनिता अमृतसागर
(सुभाषनगर, मिरज)



ऐरोली (नवी मुंबई)


सुभाषनगर, मिरज

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023



महिला दिन विशेषांक (भाग १) चा प्रकाशन सोहळा



मनोहारी मनोयुवाच्या फेब्रुवारी अंकाचे
तहसीलदार (पलूस) श्रीनिवास ढाणे यांचे हस्ते प्रकाशन.



राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर
यांचे वतीने साड्या वाटप



ज्येष्ठ नागरिक संघ श्रीकृष्णनगर (नागपूर) सदस्य
महिला दिन साजरा करताना.



ज्येष्ठ नागरिक संघ पलूस यांचे वतीने
ऊसतोडणी मजूरांना वस्तू वाटप

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,

____________________

____________________

____________________